न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# निवडणूक हलक्यात घेऊ नका, सजग राहा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## अण्णा बनसोडे हे सामाजिक भान जपणारे नेते : आमदार अण्णा बनसोडे यांना विजयी करण्याचे आवाहन...



**पिंपरी | प्रतिनिधी**

ही विधानसभा निवडणूक हलक्यात घेऊ नका. कोणीही गाफील राहू नका. १९९९ साली तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार २७० विरुद्ध २६९ असे एका खासदारामुळे पडले होते. आपल्याला प्रत्येक जागा महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणीही गाफील राहू नका असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीच्या कार्यकर्त्यांना केले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सर्वाधिक फायदा पिंपरी विधानसभा मतदारसंघातील महिलांना झाला आहे. आ. अण्णा बनसोडे यांनी यासाठी चांगले काम केले. करोना काळात शहरातील नागरिकांचे लसीकरण होण्यासाठी बनसोडे यांनी २५ लाख रुपयांचा निधी जिल्हाधिकाऱ्यांना दिला. तसेच इतर आरोग्यविषयक सुविधांसाठी सव्वा कोटींचा निधी दिला. बनसोडे हे सामाजिक भान जपणारे नेते आहेत, म्हणूनच त्यांना तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री पवार यांनी केले.

काळभोरनगर, आकुर्डी येथे महायुतीचा मेळावा पार पडला. मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, उमा खापरे,आरपीआयच्या महिला प्रदेशाध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, माजी महापौर व समन्वयक योगेश बहल, माजी उपमहापौर तुषार हिंगे, प्रभाकर वाघेरे, आतिश बारणे, आरपीआय चे नेते बाळासाहेब भागवत व शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, महाराष्ट्र शासन अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे, ज्ञानेश्वर कांबळे, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, राष्ट्रवादी शहर कार्याध्यक्ष फजल शेख, शाम लांडे, भाजपा शहर कार्याध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी नगरसेवक राजेश पिल्ले, संदीप वाघेरे, नारायण बहिरवाडे, वैशाली काळभोर, राजू दुर्गे, उल्हास शेट्टी, माई काटे, संजय काटे, सुजाता पालांडे, काळूराम पवार, जितेंद्र ननवरे नारायण बहिरवाडे, सतीश दरेकर, राजेश वाबळे, सरिता साने, युवा नेते निलेश डोके, शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष विजय लोखंडे, राष्ट्रवादी युवती शहराध्यक्ष वर्षा जगताप, सामाजिक न्याय महिला अध्यक्ष गंगा धेंडे, असंघटित कामगार नेते रवींद्र ओव्हाळ, युवा नेते अनुप मोरे, कष्टकरी कामगारांचे नेते बाबा कांबळे, सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष संजय अवसरमल, शेखर काटे, मायला खत्री, अक्षय माछरे, तुषार ताम्हाणे, हाजीभाई शेख, कविता खराडे, राजू लोखंडे, चंदा लोखंडे, प्रकाश सोमवंशी, बाळासाहेब वाल्हेकर, निलेश तरस, शैला पाचपुते, पल्लवी पांढरे, आशा शिंदे, सुनीता अडसूळ, मनीषा गटकळ, युसुफ कुरेशी, अकबर मुल्ला, प्रदीप आवटे, विनोद वरखडे, आदी उपस्थित होते. ( उर्वरित पान २ वर )

# राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचारात सहभाग घेतल्यास शिस्तभंगाची कारवाई...

## असे निर्देश शिक्षण विभागाने सर्व शिक्षकांना दिले आहेत.



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी राजकीय पक्षांच्या निवडणूक प्रचार कामात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभाग घेतल्यास त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करावी, असे निर्देश शिक्षण विभागाने सर्व शिक्षकांना दिले आहेत.

राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यानुसार आचारसंहिता नियमाचे पालन करण्याबाबतचे विविध प्रकारचे निर्देश निवडणूक आयोगाकडून देण्यात आले आहेत. तसेच, राज्यातील शाळा-महाविद्यालयातील शिक्षकेतर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सामाईक परिनियम अस्तित्वात येईपर्यंत महाराष्ट्र नागरीसेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणातभाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. तसेच, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही. अथवा सहाय्य करता येणार नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही कर्मचाऱ्यास विधानसभेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणुकीत प्रचार करू शकणार नाही, हस्तक्षेप करू शकणार नाहीत.

> **महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या शैक्षणिक कर्मचाऱ्याला कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा राजकारणात भाग घेणाऱ्या कोणत्याही संघटनेचा सदस्य होता येणार नाही. तसेच, त्यांच्याशी संबंध ठेवता येणार नाही किंवा कोणत्याही राजकीय चळवळीत किंवा कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेता येणार नाही.**
>
> **- संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, महापालिका..**

# पुनावळे परिसरात राहुल कलाटे समर्थकांचा 'डोअर टू डोअर' प्रचार

## ग्रामस्थांना, मतदारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राहुल कलाटे यांच्या प्रचाराने चांगला जोर पकडला आहे. राहुल कलाटे समर्थकांनी पुनावळे परिसरात 'डोअर टू डोअर' मतदारांच्या भेटी घेत प्रचार सुरू केला आहे.

पुनावळे गावामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राहुल तानाजी कलाटे यांच्या प्रचारार्थ समर्थकांनी पुनावळे गावठाण, कोयते वस्ती, पांढरे वस्ती, काटे वस्ती, गायकवाड नगर, सावंत पार्क, पवनानगर, ताजणे वस्ती, ढवळे नगर, माळवाडी पुनावळे ग्रामस्थांना भेटून प्रचार पत्रक दिले. ग्रामस्थांना मतदारांना तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील क्र.१ नंबरचे बटन दाबून प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात येत होते.

यावेळी पुनावळे गावचे माजी सरपंच लक्ष्मण मोहिते, उपसरपंच सुभाष रानवडे, बाळासाहेब बोडके, शिवसेना विभाग प्रमुख नितीन दर्शले, शिवसेना विभाग संघटक अमित दर्शले, निलेश ढवळे, अतुल ढवळे, नवनाथ गायकवाड, सागर बोरगे, गणेश फेंगसे, सोमनाथ फेंगसे, नवनाथ मोहिते, अनिकेत पांढरे, माऊली कुदळे, सागर शिंदे, विठ्ठल तात्या कलाटे, विजय दादा कलाटे, मोहनदादा भूमकर, केदार दर्शले, संतोष दर्शले, ऋषिकेश पांढरे यांचे सह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संतपीठावरील संचालकांचे 'कॅलिबर' काय?

## महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्या वक्तव्याने नवा वाद..!

**पुणे | प्रतिनिधी**

भारतातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ पिंपरी-चिंचवडमधील ऐतिहासिक टाळगाव चिखलीत उभारण्यात आले. या संतपीठावरुन नवा वाद निर्माण झाला आहे. किंबहुना, संतपीठावरील संचालकांच्या पात्रतेवर महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांनी जाहीर सभेत प्रश्नचिन्ह निर्माण केले. परिणामी, वारकरी सांप्रदाय आणि शिक्षण क्षेत्रातून संताप व्यक्त होत आहे.

महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी थेट लढत पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू आहे. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही जागांवर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून उमेदवार रिंगणात उतरले आहेत. भोसरीतून अजित गव्हाणे, पिंपरीतून सुलक्षणा शिलवंत आणि चिंचवडमध्ये राहुल कलाटे निवडणुकीच्या 'तुतारी'च्या चिन्हावर रिंगणात आहेत.

भोसरीतील एका सभेमध्ये अजित गव्हाणे यांनी विद्यमान आमदार आणि महायुतीचे उमदेवार महेश लांडगे यांना संतपीठाच्या मुद्यावर लक्ष्य केले. भाषणाला जोर चढला आणि 'संतपीठावर ज्यांना संचालक केले आहे.. त्याचा इतिहास चेक करा... त्यांचे कॅलिबर तुमच्या लक्षात येईल' असा गंभीर आरोप केला. त्यामुळे वारकरी सांप्रदाय आणि शिक्षण क्षेत्रात उलटसुलट चर्चा सुरू झाली. विशेष म्हणजे, आजच्या घडीला या संतपीठामध्ये १ हजार ६०० हून अधिक विद्यार्थी संतसाहित्य आणि आधुनिक शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. त्यामुळे त्यांच्या पालकांमध्येही संभ्रम निर्माण झाला.

वास्तविक, संतपीठाचे पदसिद्ध अध्यक्ष व मुख्य संचालक महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आहेत. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच संतपीठाचे संचालन करते. यासह संतपीठावर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती महामंडळाचे अध्यक्ष आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे वंशज, संतसाहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे (देहुकर), आळंदी देवस्थान ट्रस्टचे माजी सदस्य, शिक्षणक्षेत्रातील तज्ञ आणि संपादक, लेखक, अर्थतज्ञ असा लौकीक असलेले डॉ. अभय टिळक यांचा संतपीठाच्या संचालक मंडळामध्ये समावेश आहे. त्यामुळे अजित गव्हाणे आता तुकोबारायांचे वंशज, आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांचे 'कॅलिबर' म्हणजे पात्रता तपासणार आहेत का? असा संतत्प सवाल उपस्थित केला जात आहे.

किंबहुना, संतपीठ ही मूळ संकल्पना स्व. दत्ता साने यांची आहे. त्या संकल्पनेला मूर्तरुप आमदार महेश लांडगे यांनी दिले. संपतीठाच्या प्रस्तावापासून सल्लागार नियुक्ती, निविदा प्रक्रिया, वर्क ऑर्डर, भूमिपूजन आणि लोकार्पण आणि आता संतपीठाचे यशस्वीपणे संचालन सुरू आहे. मात्र, अजित गव्हाणे यांच्यासारख्या सुसंस्कृत आणि अभ्यासू नेता चुकीच्या माहितीच्या आधारे आक्षेपार्ह वक्तव्य केले. "तुका म्हणे ऐशा नरा... मोजुनी माराव्या पैजारा.." अशा संतत्प प्रतिक्रिया वारकरी सांप्रदाय आणि शिक्षण क्षेत्रातून येत आहेत. त्यामुळे संतपीठाच्या मुद्यावर गव्हाणेंचा 'सेल्फ गोल' झाला, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.



### बोला रामकृष्ण हरी... तुतारीला पाठवा घरी – हभप दत्ताआबा गाकवाड

» दिघी येथील भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये दिघीतील ज्येष्ठ नेते आणि वारकरी सांप्रदायातील माननीय व्यक्तीमत्व ह.भ.प. दत्ताआबा गायकवाड यांनी दिघीच्या विकासाच्या मुद्यावर राष्ट्रवादी शरद पवार पक्षावर प्रहार करतानाच "रामकृष्ण हरी" म्हणण्याचा नैतिक अधिकार तुम्हाला नाही, असे खडे बोल जाहीर सभेत सुनावले. जो पक्ष आणि त्यांचा नेता रामाला कृष्णाला आमच्या देव-देवतांना मानत नाही. आमच्या स्वामी समर्थांचा, आमच्या गजानन महारजांचा अवमान केला जातो. त्याबद्दल आवक्षर न काढणाऱ्यांच्या तोंडी रामकृष्ण हरी शोभत नाही म्हणून.." बोला रामकृष्ण हरी... तुतारीला आता पाठवा घरी" असा अप्रत्यक्ष ठराव वारकरी सांप्रदायाने केला आहे. वारकरी सांप्रदाय कदपि महाविकास आघाडीसोबत राहणार नाही. कारण, भले त्यासी देवू कासेची लंगोट... नाठाळाच्या माथी हाणू काठी...ही संत तुकोबारायांची शिकवण आहे, अशी संतप्त टीका हभप दत्ताआबा गायकवाड यांनी केली आहे.

# चिंचवडच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट माझ्याकडे तयार : भाऊसाहेब भोईर

## चिंचवड मतदार संघातील जनता मला विधानसभेत पाठवेल – भाऊसाहेब भोईर

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी येथून प्रचार शुभारंभ झाल्यापासून आतापर्यंत प्रचाराच्या पूर्वार्धात प्रत्यक्ष मतदारांना जावून भेटणे आणि त्यांच्याशी सुसंवाद साधण्यावर भर देत चिंचवड विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार भाऊसाहेब भोईर मोठ्या उत्साहात प्रचार करीत आहेत. आज सकाळच्या सत्रात वाल्हेकरवाडी परिसरातील मतदार बंधू भगिनींच्या गाठी भेटी घेवून संवाद साधला. यावेळी भाऊसाहेब भोईर युवा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांसह इतर मान्यवर देखील उपस्थित होते.

याप्रसंगी भोईर म्हणाले की आजच्या स्पर्धेच्या आणि धकाधकीच्या युगात तांत्रिक दृष्ट्या आपण प्रगत झालो असलो तरी माणसां – माणसातील संवाद दुरावत चालला आहे. तो प्रत्यक्ष भेटीतून घडावा. त्यातून आपल्यातील स्नेह वाढत जावा याच उद्देशाने प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात जन जनसंवाद साधण्यासाठी प्रत्यक्ष लोकांच्या घरी जावून मी भेटी घेत आहे. या भेटीतूनच आपलेपणा जाणवतो, बंधुभाव जोपासला जातो. निवडणुका असो किंवा नसो माझा जनतेशी जनसंवाद सुरू असतोच, पण सध्या मला संवादा बरोबरच लोकांच्या मतांचा मोठा पाठिंबा हवाय. सुसंवादाचे रूपांतर मतदानात व्हावे अशी भावना यावेळी उपस्थित असलेल्या जनतेशी भाऊसाहेब भोईर यांनी केली.



ते पुढे म्हणाले की चिंचवडच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट माझ्याकडे तयार आहे. चिंचवड मतदार संघाचा विकास करून घ्यायचा असेल तर जनतेने कपाट चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड बहुमताने निवडून आणण्याची जबाबदारी आता जनतेने हाती घेतली पाहिजे. माझा सर्वच क्षेत्रातील असलेला जनसंपर्क चिंचवड मतदार संघा च्या विकासासाठी उपयोगी ठरणार आहे. जनतेने मला खंबीरपणे साथ द्यावी चिंचवड मतदार संघाचे विकासासाठी मी कटिबद्ध आहे. तरी जनतेने सकारात्मक विचार करून माझ्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन भाऊसाहेब भोईर यांनी केले.

याप्रसंगी वालेकरवाडी येथील संदीप भालके , आशिष कोर्टेकर , सुरज शिंदे , अरुण पवार , शुभम झोंबाडे , विशाल जाधव , दत्ता जाधव , अनिकेत भोगे , गणेश कवडे , बाळासाहेब वाल्हेकर , तात्या आहेर , श्रीधर वालेकर , अशोक भालके , संदीप भालके , पोपट शिवले , सत्यवान शिवले , गोपाल दगडे , सुधीर हनवते , रमेश अवटी , अरुण पवार , आबा वाल्हेकर , ज्ञानेश्वर शिवले , राजेंद्र अवटी , बाळासाहेब वाल्हेकर, अशोक वाल्हेकर , गणेश कवडे इत्यादी मान्यवर भेटी गाठीत सहभागी होते.

> सध्या माझ्या प्रचारात" मतदार स्वतः हून सहभागी होत आहेत. यावरून असं जाणवतंय की चिंचवड मतदार संघात नागरिकांना आता बदल हवा आहे. आणि त्यासाठी माझ्यासारख्या सुशिक्षित व्यक्तिमत्त्वाला आपला लोकप्रतिनिधी म्हणून लोकं माझ्याकडे पहात आहेत. माझ्या अनेक सकारात्मक बाजू आहेत. त्यामुळे लोकांचा विश्वास संपादन करीत असताना प्रत्यक्ष काम करण्यासाठी जनता मला विधानसभेत पाठवतील असा विश्वास आहे"
>
> - भाऊसाहेब भोईर ( अपक्ष उमेदवार : चिंचवड विधानसभा मतदारसंघ )

# निवडणूक हलक्यात घेऊ नका, सजग राहा : उपमुख्यमंत्री अजित पवार..

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

अजित पवार म्हणाले, अण्णा बनसोडे हे सर्वसामान्य कार्यकर्ते होते. त्यांचा संपर्क चांगला आहे. त्यांना त्यांचे काम करू द्या. बनसोडे आणि महायुती यांच्यामध्ये समन्वय राखण्याचे काम योगेश बहल, सदाशिव खाडे हे करतील. पुढील काळात विरोधक चुकीच्या गोष्टी पसरवतील अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहन पवार यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली. त्यामुळे उद्योग नगरीसह या शहराची मिनी भारत म्हणून ओळख झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरावर माझे प्रेम आहे. लक्ष्मण जगताप तसेच महेश लांडगे हे देखील माझेच कार्यकर्ते आहेत, असे म्हणत उपमुख्यमंत्री पवार यांनी दिवंगत नेते लक्ष्मण जगताप यांच्या आठवणींना उजाळा दिला. या निवडणुकीत माघार घेतलेल्या उमेदवारांचेही त्यांनी आभार मानले.

विरोधकांवर टीका करताना अजित पवार म्हणाले, विरोधकांकडून पंचसूत्रीच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या. महिलांना तीन हजार रुपये देणार असल्याचे विरोधकांकडून सांगण्यात आले. आम्ही दीड हजार रुपये देत असताना राज्याची तिजोरी खाली झाल्याचा आरोप करण्यात आला. मग आता हे तीन हजार रुपये कुठून आणणार हा प्रश्न आहे. आम्ही अशा योजना राबविताना आर्थिक नियोजन केले आहे. राज्यातील ग्राहकांना एक युनिट वीज पुरविण्यासाठी सात रुपये खर्च येतो. मात्र सोलर द्वारे निर्मित झालेल्या विजेचा पुरवठा करण्यासाठी साडेतीन रुपये खर्च येतो. शिल्लक राहिलेले पैसे शेतकऱ्यांसाठी देणार त्याचे आर्थिक नियोजन केले आहे. विरोधक लोकांना फसवण्याचे काम करत आहेत. हा त्यांचा चुनावी जुमला आहे असे पवार म्हणाले.

भारतातील एकूण विदेशी गुंतवणुकीत आपण प्रथम असून ५२ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय मोठे प्रकल्प राज्यात गुंतवणूक करून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करत आहेत. महाराष्ट्र परदेशी गुंतवणूकीत सर्वात पुढे आहे. क्रमांक एकवर आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादीच्या वाट्याला आलेल्या एकूण जागांपैकी दहा टक्के जागा मुस्लिम, बारा टक्के जागा अनुसूचित जाती, बारा टक्के जागा अनुसूचित जमाती आणि दहा टक्के जागा महिलांना दिल्या आहेत. एकूण ४४ टक्के जागा सर्व समाज घटकांना दिल्या. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांचा पुरोगामी विचार पुढे घेऊन जात पुरोगामी महाराष्ट्र घडविण्याचा आपला प्रयत्न असल्याचे पवार म्हणाले.

पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन टाटा धरणातून पाणी आणावे लागेल. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रिंग रोड बनवला जात आहे. पीएमपीएमएल सक्षम केली जात आहे. मेट्रोचे जाळे वाढवले जाते आहे. शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प आणखी जास्त राबवावे लागतील. पिंपरी मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या मागील जागेवर रमाई स्मारक होणार आहे. हे स्मारक नावाला साजेसे होणार आहे. पिंपरी चिंचवड शहराचा विकासाचा वेग आणखी वाढवण्यासाठी आण्णा बनसोडे यांना विजयी करा असे आवाहन अजित पवार यांनी केले.

# दुर्गादेवी टेकडीवर 'वॉकेथॉन फॉर मतदान'

## सिनेअभिनेत्री श्रेया बुगडे यांनी नागरिकांना मतदान करण्याचे केले आवाहन : नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

मतदार जनजागृती व स्वीप प्रक्षेपण (लॉंचिंग) पिंपरी चिंचवड महापालिकेचे वतीने निगडी येथील इंदिरा गांधी उद्यान (दुर्गादेवी टेकडी) येथे "वॉकेथॉन फॉर मतदान" उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रेया बुगडे यांनी नागरिकांशी संवाद साधला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त अण्णा बोदडे, कनिष्ट अभियंता सारिका नागरगोजे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम, ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक -युवती, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी आबालवृद्धांसह नागरिकांनी एकच गर्दी केली. दुर्गादेवी टेकडीच्या परिसरात मतदार जनजागृतीचे वातावरण सर्वत्र पसरले होते. दुर्गादेवी टेकडी येथे महापालिकेच्या वतीने आयोजित "वॉकेथॉन फॉर मतदान" या उपक्रमात सिनेअभिनेत्री श्रेया बुगडे यांनी टेकडीवर फिरायला आलेले ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक - यवती, माजी सैनिक, नवमतदार, नागरिक यांच्याशी संवाद साधला.

यावेळी श्रेया बुगडे म्हणाल्या, "मानवी सुदृढ आरोग्यासाठी जसे व्यायाम, योगासने, शारीरिक कवायती महत्वाच्या आहेत तसेच लोकशाहीच्या आरोग्यासाठी मतदान करणे अतिशय महत्वपूर्ण आहे. त्यासाठी नागरिकांनी निवडणुकीमध्ये आपल्या मताचा हक्क बजावत आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

मताधिकार हा आपल्याला संविधानाने दिलेला महत्वपूर्ण हक्क आहे. निवडणुकीत मतदान करण्याची संधी प्रत्येक मतदाराला ५ वर्षाने मिळते. ज्याचा वापर करून आपण आपल्या कुटुंबाचे, राज्याचे पर्यायाने देशाचे भविष्य उज्वल करू शकतो. मतदारांनी मतदान करण्याची ही अनोखी संधी न गमावता येत्या २० नोव्हेंबर रोजी सर्वांनी मताधिकार बजावावा, असे आवाहन श्रेया बुगडे यांनी केले.

यावेळी मतदार जनजागृतीसाठी महापालिकेने आमंत्रित केल्यामुळे विविध नागरिकांशी संवाद साधण्याची संधी मला मिळाली, असे सांगत श्रेया बुगडे यांनी महापालिकेचे आभार व्यक्त केले. यावेळी श्रेया बुगडे यांच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी आबालवृद्धांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### पथनाट्य, नृत्यकलेद्वारे मतदान जनजागृती

» दुर्गादेवी टेकडी येथे झालेल्या "वॉकेथॉन फॉर मतदान" उपक्रमात मतदार जनजागृतीपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहान मुलांनी लोकशाही तसेच देशभक्तीपर गीताच्या माध्यमातून उपस्थित नागरिकांना मतदान करण्याबाबत आवाहन केले. आकर्षक नृत्य सादर करण्याऱ्या मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस भाव, चित्तथरारक कसरती आणि त्यांची नृत्यकला पाहून उपस्थित नागरिकांनी त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. यावेळी कलाकार गणेश लोंढे यांनी आपल्या गायनाच्या माध्यमातून नागरिकांचे मतदानाचे महत्व पटवून दिले. तसेच यावेळी मतदार जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजनही करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी येत्या निवडणुकीत मतदान करण्याबाबत शपथ घेतली.

### टेकडीवर रंगल्या.. मतदानाच्या गप्पा

» टेकडीवर फिरायला आलेल्या माजी सैनिकाला श्रेया बुगडे यांनी मतदान करण्याचे आवाहन केले, यावेळी भावूक झालेल्या माजी सैनिकाने "आम्ही देशाच्या रक्षणासाठी सीमेवर हातात शस्त्र घेऊन लढत असतो तसेच मतदारांनी आपल्या देशाच्या रक्षणासाठी आपल्या मताच्या अधिकाराचा पूर्ण वापर करावा आणि मतदान नक्की करावे." मी देखील मतदान नक्की करणार असल्याचे ते म्हणाले.

# "सर्वांच्या साथीने; चिंचवड विधानसभेचा विकास करूया गतीने"

## आमदार अश्विनी जगताप यांची साद : पिंपळे गुरवमध्ये अश्विनी जगताप यांचा झंझावाती प्रचार दौरा

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघात भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाइं (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचाराच्या निमित्ताने आमदार अश्विनी जगताप यांनी पिंपळे गुरव, प्रभाग क्र.२९ मधील नागरिकांशी संवाद साधण्यासाठी दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी शंकर जगताप यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांचे विकासाचे वचन जनतेसमोर मांडले आणि मतदारांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच "सर्वांच्या साथीने; चिंचवड विधानसभेचा विकास करूया गतीने" या विचारधारेखाली त्यांनी नागरिकांना शंकर जगताप यांच्या रूपात एक जबाबदार आणि कर्तव्यदक्ष प्रतिनिधी मिळेल, यासाठी आश्वस्त केले.



चिंचवड विधानसभा मतदार संघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आमदार अश्विनी जगताप यांनी पिंपळे गुरव प्रभागाचा दौरा केला. यावेळी त्यांनी सुदर्शन नगर, वैदू वस्ती, गुलमोहोर कॉलनी, साईनाथ नगर, तुळजाभवानी नगर, गुरुदत्त नगर, गंगोत्री नगर, विजय नगर, शिवराम नगर, शिवदत्त नगर, सहकार नगर, भैरवनाथ नगर, प्रभात नगर, सृष्टी चौक, क्रांती नगर, जवळकर नगर, काशीद नगर, पिंपळे गुरव गावठाण परिसरातील नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या.

यावेळी त्यांच्यासोबत माजी नगरसेवक शशिकांत कदम, सागर अंघोळकर, माजी नगरसेविका उषा मुंडे, चंदा लोखंडे, रमेश जगताप, रमेश काशीद, महेश जगताप, दीपक काशीद, राहुल जवळकर, कावेरी जगताप, शोभा जांभुळकर, अमर आदियाल, शशिकांत दुधारे, नितीन कदम, राजेश लोखंडे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

"चिंचवडच्या प्रगतीसाठी, आपल्या सर्वांची साथ हवी" अशी साद आमदार अश्विनी जगताप यांनी नागरिकांना घातली. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी या क्षेत्रात केलेले प्रयत्न आणि योगदानामुळे हा परिसर आज विकासाच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे. त्यामुळे यापुढेही असाच विकास अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना मोठे मताधिक्य देऊन त्यांना काम करण्याची संधी देण्याचे आवाहन आमदार अश्विनी जगताप यांनी केले.

या दौऱ्यादरम्यान अश्विनी जगताप यांनी स्थानिक महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांशी संवाद साधला. शंकर जगताप यांनी केलेल्या समाजोपयोगी कार्याचे महत्त्व पटवून दिले. आणि त्यांच्या नेतृत्वाखाली आगामी काळात चिंचवडमध्ये अधिक सकारात्मक बदल घडतील याची जाणीव करून दिली.

दरम्यान, आमदार अश्विनी जगताप यांच्या या प्रचार दौऱ्याला पिंपळे गुरवमधील रहिवाशांनी जोरदार स्वागत करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांचा विक्रमी मताधिक्याने महाविजय साकार करायचा, असा चंग आमदार अश्विनी जगताप यांच्या साक्षीने बांधला आहे.

# सर्वच गणेश मंडळांकडून ध्वनिप्रदूषण!

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ देणार 'एनजीटी'ला अहवाल : 70 ते 85 डेसिबलपर्यंत नोंद

**पुणे | प्रतिनिधी**

यंदा गणेशोत्सवात सर्वच ठिकाणी आवाजाच्या पातळीने ध्वनिप्रदूषणाची कमाल मर्यादा ओलांडल्याची बाब समोर आली आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने यंदा प्रथमच दोनशे गणेश मंडळाच्या ठिकाणी केलेल्या तपासणीतून हे उघड झाले आहे. गणेशोत्सवाच्या काळात ध्वनिप्रदूषणाची पातळी ७० ते ८५ डेसिबलपर्यंत नोंदविण्यात आली. याबाबतचा अहवाल राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे (एनजीटी) सादर करण्यात येणार आहे.



यंदाच्या गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिले होते. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहरातील २०० गणेश मंडळांच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी मोजण्यात आली. त्या शहरातील मध्यवर्ती भागातील मंडळांसह उपनगरांतील मंडळांचा समावेश होता. गणेशोत्सवात ७ ते १६ सप्टेंबर या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ही पातळी मोजली गेली. यात आवाजाची पातळी ७० ते ८५ डेसिबलपर्यंत नोंदविण्यात आली. यामुळे गणेशोत्सवाच्या काळात शहरभर ध्वनिप्रदूषण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. यात गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दिवसाच्या ध्वनिप्रदूषणाची नोंद घेण्यात आली नव्हती.

गणेशोत्सवातील वाढत्या ध्वनिप्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस गंभीर स्वरूप धारण करीत असल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. कल्याणी मांडके यांनी न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल केली होती. यात राज्य सरकार, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे महापालिका आणि पुणे पोलिसांना प्रतिवादी करण्यात आले होते. पुण्यात गणेशोत्सवादरम्यान ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. यावर न्यायाधिकरणाने महाराष्ट्र प्रदूषण मंडळासह पुणे पोलिसांना ध्वनिप्रदूषण कमी करण्याचा आदेश दिला होता. त्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०० गणेश मंडळाच्या ठिकाणी आवाजाची पातळी तपासण्याचे पाऊल उचलले होते.

### आवाजाची मर्यादा पातळी

- विभाग – दिवसा – रात्री
- औद्योगिक – ७५ – ७०
- व्यावसायिक – ६५ – ५५
- निवासी – ५५ – ४५
- शांतता क्षेत्र – ५० – ४०

> राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या आदेशानुसार गणेशोत्सवाच्या काळात दोनशे गणेश मंडळाच्या ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची पातळी तपासण्यात आली. त्याचा अहवाल तयार करण्यात आला असून, तो न्यायाधिकरणासमोर सादर केला जाणार आहे.
>
> **- कार्तिकेय लंगोटे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.**

# विद्यापीठ, महाविद्यालय संकुलात आता प्लास्टिकबंदी

## विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केले परिपत्रक : प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी घेतला निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम रोखण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता विद्यापीठ आणि महाविद्यालयाच्या संकुलात प्लास्टिकवर बंदी घालण्यात आली आहे.या संदर्भात यूजीसीने मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केली आहेत.



उच्च शिक्षण संस्थांनी एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या व्यापक समस्येचा सामना करण्यासाठी त्यांचे प्रयत्न वाढवावे. हा उपक्रम केवळ आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठीच नव्हे, तर मानवी आरोग्याचे रक्षण, कचरा व्यवस्थापन, हवामान बदलाशी लढा आणि आर्थिक स्थिरतेला प्रोत्साहन देण्यासाठी महत्वपूर्ण आहे, असेही यूजीसीने म्हटले आहे.

सर्व शैक्षणिक संस्थानी उपाहारगृहासह इन्स्टिट्यूटच्या परिसरात प्लास्टिकवर बंदी घालावी. प्लास्टिकच्या हानिकारक प्रभावांबद्दल जागरूकता मोहिमेसाठी शैक्षणिक संस्थांनी कार्यशाळा आयोजित करावी. विद्यार्थ्यांना संस्थेत प्लास्टिकच्या वस्तू आणू नये, असे आदेश द्यावे, असेही यूजीसीने नमूद केले आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबांना प्लास्टिकच्या हानीकारक प्रभावांबद्दल जागरूक करण्यासाठी आणि त्यांचे घर प्लास्टिकमुक्त बनवण्यासाठी प्रोत्साहित करावे. प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर टाळण्याकरिता संस्था विद्यार्थ्यांसाठी मुबलक प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देतील. तसेच कापडी पिशव्या, कागदी पिशव्या इत्यादी पर्यायी उपायांच्या वापरास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतील, असेही यूजीसीने नमूद केले आहे.

ज्या प्रमाणात सिंगल यूज प्लास्टिकवर बंदी घालण्याची हवा करण्यात आली होती, त्याप्रमाणे कायदा करण्यात आला नाही. केवळ लोकजागरण, लोकांना प्लास्टिकचे दुष्परिणाम सांगणे एवढ्यापुरतीच आपली वाटचाल केंद्र सरकारने सीमित केली आहे. राज्य सरकारांनाही याचप्रमाणे आदेश दिले गेले आहेत. आता यूजीसीनेदेखील "विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांच्या आवारात बंदी घालणे स्वागतार्ह निर्णय आहे. परंतु हा त्या प्रश्नापासून सुटण्याचा मार्ग नाही, हे सरकारच्या लक्षात आले, ही अतिशय चांगली गोष्ट झाली. त्यानिमित्त नवे पर्यायदेखील तपासले जातील," अशी अपेक्षा व्यक्त केली.